महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) गट-अ मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या-
ज्येष्ठ अधिव्याख्याता

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली ३११८/प्र.क्र.९१/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ मे, २०१८

वाचा:- शा.शि.व क्री.वि.शासन निर्णय क्र.ईएसटी-३९१७/प्र.क्र.४६/प्रशा-२, दिनांक १७.०३.२०१७

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हे दिनांक ०१ जुलै, २००६ पासून अंमलात आले आहेत. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ६ नुसार बदली करण्याबाबत सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले आहेत. तसेच या कलमाच्या परंतूक २ नुसार बदली करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, या कलमाखाली त्याचे अधिकार त्याच्या कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सोपविता येतील, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ व गट-ब मधील विविध संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार प्रत्यार्पित करण्याचा निर्णय दिनांक ३० मे, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आलेला आहे.

२. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१८ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचा प्रस्ताव नागरी सेवा मंडळासमोर सादर करण्यात आला होता. नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या पूर्व मान्यतेनुसार खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्यांची बदलीने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक-३ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव व पदनाम	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४
१.	डॉ. दयानंद धोंडीराम जटनुरे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. उस्मानाबाद	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. पुणे	श्रीमती भालेराव यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर

अ.क्र.	नाव व पदनाम	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
२.	श्री. संभाजी जा. भोजने, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. रायगड	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. गडचिरोली	रिक्त पदावर
३.	श्रीम.रत्नप्रभा तु. भालेराव, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि. सं. पुणे	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. नाशिक	रिक्त पदावर
४.	कु.मनिषा भडंग, प्राध्यापक प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर (प्रतिनियुक्ती)	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. अमरावती	रिक्त पदावर
५.	डॉ. प्रशांत गावंडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. यवतमाळ	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. बुलढाणा	रिक्त पदावर
६.	श्री.विजयकुमार आ. गदगडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या. वि.सं. सांगली	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. सोलापूर	रिक्त पदावर
७.	श्री.विजयकुमार आर. शिंदे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. उस्मानाबाद	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. बुलढाणा	रिक्त पदावर
८.	श्री आर.एन.गिरी, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. लातूर	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. उस्मानाबाद	श्री. जटनुरे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर
९.	श्रीमती सुहासिनी परमणे, ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. सातारा	ज्येष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. सांगली	रिक्त पदावर

३. श्रीमती संघमित्रा वि. त्रिभुवन, जेष्ठ अधिव्याख्याता, जि.शै.सा.व्या.वि.सं. ठाणे हे सध्या प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई येथे प्रतिनियुक्तीवर असल्यामुळे, त्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. उक्त अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक-सीडीआर १०८२/२५६७/२८/अकरा दिनांक ३० ऑगस्ट १९९२ च्या परिपत्राकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

६. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरीता बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे वेतन कोणत्याही परिस्थितीत दिनांक १ जुलै, २०१८ पासून बदलीपूर्व कार्यालयाने आहरित करु नये.

७. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१८१६२७४८०९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.05.18 16:28:58 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
२) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे
३) सर्व शिक्षण संचालक
४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
५) संबंधित प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था,
६) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७) संबंधीत अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती, प्रशा-२.